# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### गोंदिया जिल्ह्यात पारंपारिक मत्स्यव्यवसायाला प्रोत्साहन मिळण्याबाबत

**(१) १५१ (२६-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात पारंपारिक मत्स्यव्यवसाय मोडकळीस आला असून या व्यवसायासाठी जिल्ह्यात ६७७८ अनुकूल स्त्रोत उपलब्ध असून तब्बल १३३ मत्स्यपालन संस्था डबघाईस आल्या असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त व्यवसायावर अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबांना रोजगारासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय संस्थांना प्रोत्साहन देऊन व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१५-०५-२०२५) :** (१) हे खरे नाही,

गोंदिया जिल्ह्यामध्ये एकूण १३४ मत्स्यपालन सहकारी संस्था असून त्यामध्ये सुमारे ११००० मच्छीमार सभासद आहेत. गोंदिया जिल्ह्यामध्ये पाटबंधारे विभागाचे एकूण ६४ तलाव असून शासन निर्णय दिनांक ०३.०७.२०१९ च्या धोरणानुसार सदर पाटबंधारे तलाव संबंधित मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात आलेले आहेत.

त्याचप्रमाणे गोंदिया जिल्ह्यात एकूण १४४ मालगुजारी तलाव असून जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडून मत्स्यपालन सहकारी संस्थेस प्राधान्याने मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) गोंदिया जिल्ह्यात बांध पध्दतीद्वारे पावसाळ्यात मत्स्यप्रजनन करुन मत्स्यबीज निर्मिती करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी, सन २०२२-२३ मध्ये बांध प्रजननासाठी उपयोगी असणारे साहित्याचा पुरवठा ९ संस्थांना मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत रुपये ८.९७ लक्ष खर्च करुन लाभ देण्यात आला होता.

तसेच जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मासेमारीसाठी आवश्यक असणारे मासेमारी जाळे व नौका अनुदानावर खरेदीसाठी ५०% अनुदानाने स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रुपये १८ लक्ष तरतुद जिल्हा नियोजन समितीअंतर्गत अर्थसंकल्पीत असून त्याचा लाभ गोंदिया जिल्ह्यातील मच्छीमारांना होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील मध्यवर्ती तहसील कार्यालयाची इमारत जीर्ण झाल्याबाबत

**(२) १७६ (२६-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील मध्यवर्ती तहसील कार्यालयाची इमारत जीर्ण झाल्याने दिघी रोडवर तहसील कार्यालय हलविण्यात आल्याने शासकीय कामासाठी आलेल्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे, दिनांक ४ जानेवारी, २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी उक्त इमारत किती कालावधीपर्यंत उभारण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त कार्यालयाच्या इमारतीची डागडूजी वा पुर्ननिर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

म्हसळा (जि.रायगड) येथील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असून दिघी रोड येथे तहसिल कार्यालय स्थलांतरीत करण्यात आहे. परंतु नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होत नाही.

(२) व (३) म्हसळा (जि. रायगड) तालुक्यातील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची इमारत सन १९३०-१९३१ मधील असून ९३ वर्षे पूर्ण झालेली आहे. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट दिनांक ३०/११/२०२० रोजी झालेले असून सदर इमारत धोकादायक स्थितीत असून तांत्रिकदृष्टया कमकुवत झालेली आहे.

म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची नवीन इमारत बांधकामाकरीता जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयाकडून मुख्य अभियंता यांच्या तांत्रिक मान्यतेसह अदयावत दरसूचीवर आधारीत परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला असून शासनास प्रस्ताव प्राप्त होताच कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रसागर खाजान (ता.डहाणू-जव्हार, जि.पालघर) परिसरातील कांदळवनाच्या झाडांचे नुकसान झाल्याबाबत

**(३) २१९ (२६-०४-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रसागर खाजान (ता.डहाणू-जव्हार, जि.पालघर) परिसरातील राज्य मार्गावरील डहाणू ते चारोटी रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जमीन सपाटीकरण करताना कांदळवनाच्या झाडांचे नुकसान झाल्याचा अहवाल महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील काही झाडे मुळासकट खेचल्याने त्याच्या फांद्या तुटल्या असून याविषयी महसूल विभागाला कांदळवन विभागाने पत्र दिल्यानंतर पंचनामे करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उक्त अहवालानुसार डहाणू ते चारोटी रस्त्याच्या दोन्ही बाजूला पुन्हा नव्याने झाडे लावून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

डहाणू पारनाका ते डहाणू रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मौजे-मसोली येथील खाजण जमिनीचा स.क्र.१८३/४, क्षेत्र

३.६७.९० हे. आर व खाजण जमिनीचा स.क्र.१८०, क्षेत्र ३.२०.०० हे.आर हे दोन्ही स.क्र. चंद्रसागर रस्त्याच्या कडेला असून, सदर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी दिनांक २५.१२.२०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने पोकलन मशिन (TATA HITACHI) ने स.क्र.१८३/४ च्या बाजुला मुख्य रस्त्याच्या मध्य भागापासून सुमारे १५ फुट व स.क्र.१८० च्या बाजुला मुख्य रस्त्याच्या मध्यभागापासून सुमारे ५ फुट असे रस्त्याच्या रुंदीकरणासाठी पोकलन मशिन लाऊन साफसफाई केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी दिनांक १३.०२.२०२५ रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन तालुका स्तरावरील सनियंत्रण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एस-३०/२०१८/प्र.क्र.५९२/फ-३, दिनांक १९.१२.२०१८ मध्ये राखीव वन / संरक्षित वन म्हणून अधिसुचित नसलेल्या (खाजगी / शासकीय / निशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या ताब्यात असलेल्या) कांदळवन क्षेत्राच्या तक्रारीबाबत संबंधित कांदळवन क्षेत्र ज्या संस्थेच्या / यंत्रणेच्या ताब्यात आहे त्या यंत्रणेने तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन गुन्हा नोंद करणेची कार्यवाही करावी असे नमुद आहे. त्यानुसार सदर कांदळवन क्षेत्र हे महसूल यंत्रणेच्या ताब्यातील असल्यामुळे, सदर प्रकरणी महसूल यंत्रणेने उक्त शासन निर्णयानुसार गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना बैठकीत देण्यात आल्या.

त्यानुषंगाने उक्त नमुद शासन निर्णय दिनांक १९.१२.२०१८ अन्वये मंडळ अधिकारी, मल्याण यांनी डहाणू पोलीस ठाणे येथे प्रथम खबर क्र.००२३, दिनांक २७.०२.२०२५ अन्वये पोकलन चालकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात तलाठ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(४) २३४ (२६-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल विभागात ३००० रिक्त पदे असून त्यापैकी २४७१ पदे तलाठ्यांची असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सातबारा, शेतसारा वसुली करणे, गारपीट पंचनामे करणे, नैसर्गिक आपत्ती, रेतीवर देखरेख करणे व निवडणुकीची सर्व कामे ही तलाठ्यांना करावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सध्या एका तलाठ्याकडे तीन-चार गावांचा अतिरिक्त भार असल्यामुळे तलाठ्यांना व नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उकत प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त असलेल्या तलाठ्यांच्या पदभरतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०२५) :** (१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४.१०.०२४ अन्वये तलाठी संवर्गाचे पदनाम ग्राम महसूल अधिकारी असे करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत, ग्राम महसूल अधिकारी या संवर्गाची १७०० पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व ५) रिक्त असलेल्या ग्राम महसूल अधिकारी या पदांचा अतिरिक्त कार्यभार लगतच्या सजाच्या किंवा अन्य सजाच्या ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे सोपवून नियमित कामकाज पार पाडण्यात येत आहे. तलाठी पदभरती २०२३ बाबत एकूण ४७९३ पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध देण्यात आली होती. आजरोजीअखेर एकूण ४२१२ उमेदवारांना नियुक्ती आदेश दिले असून त्यापैकी एकूण ३८५० उमेदवार ग्राम महसूल अधिकारी पदावर हजर झाले आहेत. सद्य:स्थितीत ग्राम महसूल अधिकारी या संवर्गाची रिक्त असलेली १७०० पदे वित्त विभागाच्या मान्यतेने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात

येत आहे.

---

**जव्हार-मोखाडा-वाडा-तलासरी व विक्रमगड (जि.पालघर) येथे रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याबाबत**

**(५) २७५ (२५-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार-मोखाडा-वाडा-तलासरी व विक्रमगड (जि.पालघर) येथे रोजगार हमी योजनेची कोणतीही कामे सुरु नसल्याने आदिवासी नागरिकांना शहरी भागात रोजगार मिळण्यासाठी स्थलांतरित होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या विकासासाठी गावठाणात व गाव पाड्यांमध्ये रोजगार आणि मुलभूत व सुविधांची कामे प्रशासन मान्यतेनुसार सुरु करण्यास कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२९-०५-२०२५) :** (१) हे खरे नाही.

जव्हार, मोखाडा, वाडा, तलासरी व विक्रमगड तालुक्यातील एकत्रित महिनानिहाय मजुर उपस्थिती पुढीलप्रमाणे होती.

| | |
|---|---|
| ऑक्टोबर २०२४ | १३४४६ |
| नोव्हेंबर | १७८३० |
| डिसेंबर | ७७६४५ |
| जानेवारी २०२५ | १३०८१८ |
| फेब्रुवारी | १३१९४२ |

(२) व (३) ग्रामपंचायत व यंत्रणा स्तरावरील मागेल त्याला काम उपलब्ध करुन देण्याचे उद्देशाने शेल्फवर पुरेशा प्रमाणात कामे उपलब्ध आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्याचे विभाजन करून पिंपळनेर ह्या नवीन तालुक्याची निर्मिती करण्याबाबत**

**(६) ७५५ (२६-०४-२०२५). श्रीमती मंजुळा गावित (साक्री) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्याचे विभाजन करून पिंपळनेर या तालुक्याची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी तेथील नागरिकांसह लोकप्रतिनिधिंनी मागील अनेक वर्षापासून शासनाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुका निर्मितीच्या संदर्भात जिल्हाधिकारी, धुळे यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०११ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्याच्या बाजारपेठेवर जवळपास २०० ते २५० खेडी अवलंबून असल्याने पिंपळनेर या स्वतंत्र

तालुक्याच्या निर्मितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त नवीन तालुक्याच्या निर्मितीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) नवीन तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असल्याने याबाबत विविध बाबी तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

### रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांतील अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे सुरू असलेले कामकाज पनवेल येथील प्रशासकीय इमारतीत सुरू करण्याबाबत

**(७) ७७९ (२६-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर व कर्जत तालुक्यातील अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे सुरू असलेल्या अर्धन्यायीक स्वरूपाचे कामकाज पनवेल येथील प्रशासकीय इमारतीत सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे सुरू असलेले तंटे व अर्धन्यायीक स्वरूपाचे कामकाज करण्यासाठी अलिबाग येथे जावे लागत असल्यामुळे नागरीकांचे विशेषत: शेतकऱ्यांचे शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर व कर्जत या परिसरातील खातेदारांना सुनावणीसाठी अलिबाग येथे जावयास लागू नये आणि त्यांच्या वेळेची व पैशांची बचत व्हावी म्हणून अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील पनवेल, उरण, खालापूर व कर्जत तालुक्यातील अर्धन्यायीक स्वरूपाचे कामकाज हे दिनांक ०३.०१.२०२५ रोजीपासून पनवेल येथील प्रशासकीय इमारतीत सुरू करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे, धायरी व शिवगंगा खोरे हद्दीत वनउद्यानाची कामे निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(८) ९०९ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, धायरी व शिवगंगा खोरे हद्दीत वनउद्यान निधी अभावी काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वनउद्यानासाठी किती निधी मंजूर करण्यात आला असून निधी अभावामुळे प्रकल्पाला कोणत्या समस्या व विकास पूर्ण होण्यासाठी किती वेळ लागणार आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२५-०६-२०२५) :** (१) भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील मौजे धायरी स.नं. ८४ मध्ये वनउद्यान विकसित करण्याबाबतच्या रू.४६४.५० लक्ष इतक्या रकमेच्या आराखड्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ नागपूर यांच्या दिनांक २८.०९.२०२३ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. तसेच भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील शिवगंगा वनउद्यान विकसित करण्याबाबतच्या रू.२८६.०० लक्ष इतक्या रकमेच्या सुधारीत आराखड्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी दिनांक २५.०३.२०२५अन्वये तत्वतः मान्यता प्रदान केली आहे.
(२) व (३) भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील मौजे धायरी वनउद्यान व शिवगंगा वनउद्यान विकसित करण्याबाबतचा सन २०२५-२६ मध्ये मंजूर आराखड्यानुसार निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, पुणे यांच्याकडे सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील अल्ट्राटेक युनिटने स्थानिक नागरिकांच्या जमिनी घेतल्याबाबत**

**(९) ९३८ (२८-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) येथील माणिकगड सिमेंटच्या अल्ट्राटेक युनिटने स्थानिक नागरिकांच्या जमिनी बळकावल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी कोलाम बांधवांना भूमी अभिलेख निरीक्षक व तहसील यांच्या दिनांक १६ मे, २०१८ व दिनांक २५ ऑगस्ट, २०२० च्या अहवालानुसार कंपनीने चिन्ह्यांकीत केलेले दगड नष्ट केल्याने आदिवासी कुटुंबांना स्वत:च्या जमिनीसाठी संघर्ष करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३० डिसेंबर,२०२४ रोजी तलाठी गडचांदूर यांनी सर्वे क्र.४४ ते ४८ पर्यंत जमिनीच्या सिमांकनाची कार्यवाही केली असून सदर कंपनीने आदिवासी बांधवांची जमीन अतिक्रमण केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही
(३) उप अधिक्षक भूमी अभिलेख, राजुरा यांचेमार्फत दिनांक ३०.१२.२०२४ रोजी सिमांकनाची कार्यवाही करण्यात आली असून त्यामध्ये कंपनीने आदिवासी बांधवांच्या जमिनीवर अतिक्रमण केले नसल्याचे दिसून आले.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील विवादग्रस्त क्षेत्र वन परिक्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत**

**(१०) ९३९ (३०-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील विवादग्रस्त क्षेत्र वन परिक्षेत्रात समाविष्ट नसल्याने विवादीत क्षेत्रातून कमी करण्याबाबत मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंत्रालय, मुंबई येथे बैठक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीच्या निर्णयामध्ये उक्त क्षेत्र वगळण्याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने

उचित कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वन परिक्षेत्रात सन १९७२ मध्ये नागरिकांची वस्ती असल्यामुळे सदर जमीन वन परिक्षेत्रात येत असल्यामुळे या भागात विकास काम होत नसल्यामुळे वारंवार वन विभागाची परवानगी घ्यावी लागत असल्यामुळे विकास कामांना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त भागाचा विकास करण्यासाठी व या परिक्षेत्रात लोकवस्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शासनाने सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयाकडे विनंती करून फास्ट ट्रॅक न्यायालयासमोर घेऊन गेल्यास या भागातील नागरिकांना त्यांच्या हक्काचे पट्टे मिळतील व विकास जलदगतीने होईल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या भागाच्या विकासासाठी व नागरिकांना तातडीने त्यांच्या हक्काचे पट्टे मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०६-२०२५) :** (१) (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७.०४.२०२५ रोजीच्या आयोजित बैठकीत झालेल्या निर्णयानुसार ता.जिवती जि.चंद्रपूर येथील ११ गावातील वनखंडात समाविष्ट नसलेले क्षेत्र ५६५९.८५४ हे. आर व निर्वाणीकरण झालेले क्षेत्र २९८९.९५५ हे. आर असे एकूण ८६४९.८०९ हे. आर क्षेत्राबाबत उप वनसंरक्षक, मध्य चांदा व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या संयुक्त अहवालानुसार सदर क्षेत्र वगळण्याबाबत कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

तसेच सदर बैठकीतील निर्णयानुसार जिवती तालुक्यातील उर्वरित विवादीत क्षेत्रापैकी ५९ गावांचे सन १९८० पूर्वी वनेत्तर वापरासाठी वाटप करण्यात आलेल्या ६२०७ हे. आर क्षेत्राचे तसेच ४६ गावांचे दिनांक २५.१०.१९८० ते दिनांक १२.१२.१९९६ या कालावधीत वनेत्तर वापरासाठी वाटप करण्यात आलेल्या २६५७.९६ हे. आर क्षेत्राचे निर्वाणीकरण / वनक्षेत्रातून वगळणेकरिता प्रस्तावाबाबत वन विभाग, चंद्रपूर व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील पाणंद रस्ते शिवरस्ते वहिवाटीच्या वाटा व शेतरस्ते खुले करण्याकरिता धोरण आखण्याबाबत

**(११) ११७३ (२६-०४-२०२५). श्री.शिवाजी कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागील काही वर्षांपासून राज्यातील ग्रामीण भागामध्ये वहिवाटीच्या वाटा, शेतरस्ते, शिव रस्ते तसेच पाणंद रस्ते हे आपापसातील वाद अतिक्रमण जमिनीचे वाढते मुल्य यामुळे बंद केले जात असल्यामुळे शेतीमालाची वाहतूक, मशागत व दळणवळण यासाठी अनेकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महसूल विभागाकडे तक्रार केल्यानंतरही अपुरी कर्मचारी संख्या, इतर कामांचा ताण व लालफितीच्या कारभारामुळे वर्षानुवर्ष सदर रस्ते खुले करून मिळत नसल्याने आपापसात वाद-विवाद व प्रसंगी खुनासारखे प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत गावोगावी सर्वेक्षण होऊन सद्य:स्थितीत वहिवाट असणाऱ्या सर्व वाटा, रस्ते हे नियमित करण्याची गरज तसेच शेतकऱ्यांचेही आपापसातील संभाव्यवाद व यामुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता शासन कोणते धोरण आखणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तहसीलदार यांच्या कार्यालयाकडून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४३ व मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ अन्वये कार्यवाही केली जाते.

तसेच महाराजस्व अभियान अंतर्गत महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक ०७/०९/२०२० व शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार विशेष मोहिम राबविली जात असून यामध्ये गाव नकाशा प्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले गाडी रस्ते, पाणंद रस्ते, शेतरस्ते, शिवरस्ते, शेतावर जाण्याचा पायमार्ग लोकसहभागाव्दारे मोकळा करणे इत्यादी कार्यवाही चालू आहे.

तसेच दिनांक २२/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शेतरस्ता उपलब्ध करुन देणे व त्याबाबत ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरी नोंद घेणेबाबत क्षेत्रिय अधिकारी / प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आले आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

काही ठिकाणी अपुरे कर्मचारी संख्या आहे, ही बाब खरी आहे. परंतु रस्ते खुले करुन मिळत नसल्याने खुनासारखे गंभीर प्रकार झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले नाही. तसेच यासंबंधीत तक्रार प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवही करण्यात येते.

(३) व (४) याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तहसीलदार यांच्या कार्यालयाकडून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४३ व मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ अन्वये कार्यवाही केली जाते.

तसेच महाराजस्व अभियान अंतर्गत महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक ०७/०९/२०२० व शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार विशेष मोहिम राबविली जात असून यामध्ये गाव नकाशा प्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले गाडी रस्ते, पाणंद रस्ते, शेतरस्ते, शिवरस्ते, शेतावर जाण्याचा पायमार्ग लोकसहभागाव्दारे मोकळा करणे इत्यादी कार्यवाही चालू आहे.

तसेच दिनांक २२/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शेतरस्ता उपलब्ध करुन देणे व त्याबाबत ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरी नोंद घेणेबाबत क्षेत्रिय अधिकारी / प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिवती (जि. चंद्रपूर) तालुक्यातील महसूल विभागाने ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरिकांना भोगवटा दोनच्या शेतीचे पट्टे देऊन जमीन वन विभागाची घोषित केल्याबाबत

**(१२) १२९१ (२५-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सन १९७२ व १९९१ मध्ये महसूल विभागाने ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरिकांना भोगवटा दोनच्या शेतीचे पट्टे दिले असून जमीन वन विभागाची घोषित केल्याने फेरफार होऊ शकली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे पिण्याचे पाणी, शेतीचे पट्टे, आकर्षक जमिनीचे प्रकरणे, घरकुल, उद्योगधंदे, फेरफार, नवीन शेतीचे पट्टे, शाळा इमारत बांधकाम व दुरुस्ती आदी कामावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०२५) :** (१) व (२) हे खरे नसून पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे-

(अ) जिवती तालुक्यातील ७/१२ अभिलेखाचे अदयावतीकरण सुरु असून जमाबंदी आयुक्त यांच्या आदेशान्वये फेरफार प्रक्रिया बंद आहे.

(ब) मा.प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान मध्ये वरिल तालुक्यातील अतिदुर्गम व डोंगराळ भागात घराघरापर्यंत आरोग्य सेवा पुरवण्यात येते, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा मुख्यालय महानगरपालिका क्षेत्रात तसेच मोठ्या तालुक्यांमध्ये अप्पर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत**

**(१३) १५२३ (२६-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा मुख्यालय महानगरपालिका क्षेत्र तसेच मोठ्या तालुक्यांमध्ये अप्पर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत तहसीलदार, अकोला यांनी दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने तालुक्यांमध्ये अप्पर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०६-२०२५) :** (१) नाही.

(२) दिनांक २४/०१/२०२५ च्या शासनपत्रान्वये मागविण्यात आलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात येत असून त्याअनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साखरखेर्डा (जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीची तालुका म्हणून निर्मिती करण्याबाबत**

**(१४) १६६३ (२९-०४-२०२५). श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेर्डा (जि.बुलढाणा) या गावाची लोकसंख्या २५ हजार असून उक्त पोलीस स्टेशनअंतर्गत ५२ गावे असल्याने साखरखेर्डा तालुका निर्मितीसाठी माजी लोकप्रतिनिधी यांनी पाठपुरावा करुन या गावापासून १८ किलोमीटर अंतरावर ८२ गावे असून त्यात मेहकर व चिखली तालुक्यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत ही सर्वांत मोठी ग्रामपंचायत व सर्वांत मोठी बाजारपेठ असून सिंदखेडराजा तालुक्यात जाण्यासाठी एकही बस नसल्यामुळे साखरखेर्डा ते सिंदखेडराजा अंतर ६० किलोमीटर असल्यामुळे सिंदखेडराजा येथून परत येण्यासाठी बस उपलब्ध नसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक अडचणी लक्षात घेता उक्त तालुक्याची निर्मिती करावी अशी तेथील सर्व ग्रामस्थांनी व शहरवासियांची अनेक दिवसांपासूनची मागणी असताना अद्याप उक्त तालुक्यांची निर्मिती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यात नवीन जिल्हे निर्मितीसाठी शासनाने केलेली कार्यवाही लक्षांत घेता, साखरखेर्डा तालुक्याच्या निर्मितीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय.

(४) नवीन तालुका निर्मिती ही एक आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असल्याने याबाबत विविध बाबी तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सोलर हायमास्टचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१५) १६९५ (२६-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सोलर हायमास्टचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे त्यातील काही सोलर हायमास्ट लाईट बंद पडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट कामाची S.Q.M. यांच्याकडून तपासणी न करता बिलांची रक्कम मक्तेदारास देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित मक्तेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (१३-०६-२०२५) :** (१) व (२) खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासनाने महसूल वाढीसाठी मुद्रांक शुल्कात ५०० रुपयांची वाढ केल्याबाबत

**(१६) १७८६ (२९-०४-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने महसूल वाढीसाठी १०० ते २०० रूपयांचे मुद्रांक बंद करून प्रतिज्ञापत्र, शपथपत्रात व विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रक्रियेसाठी ५०० रूपयाच्या मुद्रांकाचा वापर करावा लागणार असल्याने त्याचा सर्वसामान्य नागरिकांना व विद्यार्थ्यांना आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुद्रांक शुल्क अधिनियमात बदल करण्याचा राज्य शासनाच्या निर्णयामुळे राज्याच्या महसूलात वाढ होणार असली तरी सर्वसामान्य नागरिकांना व विद्यार्थ्यांना त्याचा भूर्दंड सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मुद्रांक शुल्कात केलेली वाढ कमी करून सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शासन राजपत्र दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ नुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुच्छेद क्र.४, ५, ८, ९, २७, ३०, ३८, ४४, ४९, ५०, ५२ व ५८ या मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षीत संलेखावरील शंभर रुपये किंवा दोनशे रुपये इतक्या नाममात्र रकमेतील दीर्घ काळापूर्वी निश्चित केलेल्या मुद्रांक शुल्काच्या दरात पाचशे रुपये इतकी वाढ करण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाने महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्रमांक मुद्रांक-२००४/ १६३६/प्र.क्र.४३६/म-१, दिनांक ०१.०७.२००४ नुसार जात प्रमाणपत्र/ उत्पन्न प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र/ राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसुची १ मधील अनुच्छेद ४ अन्वये आकारण्यायोग्य असेलेले मुद्रांक शुल्क माफ करण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना याकरिता मुद्रांक शुल्क

भरण्याची आवश्यकता नाही.

सबब, शासकीय कार्यालयात सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपरची मागणी न करणेबाबत नोंदणी व महानिरीक्षक कार्यालयाचे पत्र जा.क्र.का.५/मुद्रांक-२४/सं.क्र.३०७/२०२४/८२२ दिनांक३०.१०.२०२४ रोजी सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निर्देशीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुराबर्डी (जि.नागपूर) येथे गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालय पूर्ण करण्याबाबत**

**(१७) १८४२ (२६-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुराबर्डी (जि.नागपूर) येथे गोंडवाना सांस्कृतिक संग्रहालयाला शासनातर्फे मान्यता दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाकरीता १३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुन्हा हे संग्रहालय सुराबर्डी येथून स्थलांतरित करुन पारशिवनी तालुक्यात उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.अशोक उईके (२६-०६-२०२५) :**(१) व (२) दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये रु.१३२१०.१२ लक्ष किंमतीच्या बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोखरी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील महालक्ष्मी स्टोन क्रशरने अवैध उत्खनन केल्याबाबत**

**(१८) २०६० (२८-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोखरी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील शिवारातील महालक्ष्मी खडी केंद्राने मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन केल्याच्या तक्रारी असल्याने सदर खडी केंद्राची एकूण १२ मुद्यावर चौकशी करून कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड व तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०२५) :** (१) मौजे पोखरी, ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील महालक्ष्मी स्टोन क्रशर (खडी केंद्र) प्रचंड प्रमाणात अवैध उत्खनन केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसिलदार, अंबाजोगाई यांना १२ मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत दिनांक २६.११.२०२४ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, अंबाजोगाई यांनी सदर ठिकाणाची संयुक्त पाहणी करण्याकरीता १) अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग,अंबाजोगाई २) उपअधिक्षक भूमि अभिलेख, अंबाजोगाई मंडळ अधिकारी, बर्दापूर व ग्राम महसूल अधिकारी, सज्जा भारज यांना सूचना देण्यात आल्या असता, त्यानुषंगाने दिनांक १६.१२.२०२४ रोजी सयुक्त ETS मोजणी केली. उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई यांनी ETS मोजणी मध्ये १०,९२७.२५ ब्रास परिमाणाचे उत्खनन झालेले असल्याचा अहवाल दिनांक १७.०२.२०२५ अन्वये तहसीलदार, अंबाजोगाई यांना सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने तहसिलदार, अंबाजोगाई यांनी दिनांक १८.०२.२०२५ अन्वये संबंधितास रू.०८,९३,५१,२४९.०७/- एवढ्या रकमेची दंडात्मक नोटीस बजाविण्यात आली आहे.

---

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील वरले ग्रामपंचायत हद्दीतील टिना रबर ॲन्ड इंफ्रास्ट्रक्चर कंपनीने केलेले अनधिकृत बांधकाम**

**(१९) २०७९ (२८-०४-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील वरले ग्रामपंचायत हद्दीतील टिना रबर ॲन्ड इंफ्रास्ट्रक्चर कंपनीने अनधिकृत बांधकाम केल्यामुळे कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०२५) :** (१) व (२) मौजे वरले, ता.वाडा, जि.पालघर येथील स.क्र.७१/२, क्षेत्र ४२,६००.०० चौ.मी. व स.क्र.७, क्षेत्र १०,५५०.०० चौ.मी. अशी एकूण ५३,१५०.०० चौ.मी. ही जमीन मे.टिना रबर ॲन्ड इंफ्रास्ट्रक्चर लि. चे डायरेक्टर श्री.भूपिंदर कुमार सेखरी यांचे मालकीची असून, त्यांचे नावे ७/१२ सदरी दाखल आहे. सदर जमीन फेरफार क्र.६०१ दिनांक २३.०१.२०१७ नुसार औद्योगिक बिनशेती असल्याचे दिसून येत आहे.

स्थळपाहणी अहवालानुसार सदर कंपनी सद्यस्थितीत चालू असून, कंपनीची कुंपन भिंत वाडा-मनोर या राज्य महामार्गापासून १७ मी. अंतरावर आहे. ग्रुप ग्रामपंचायत, वरले, ता.वाडा यांनी कंपनीला स.क्र.७ व ७१/२ मधील जागेमध्ये कंपनीचे बांधकाम करण्यासाठी दिनांक २६.१२.२०२३ रोजी व कुंपन भिंत बांधण्यासाठी दिनांक १९.०६.२०२३ रोजी ना-हरकत दाखले दिलेले आहेत. तसेच उप वनसंरक्षक जव्हार, वन विभाग जव्हार यांचेकडून कंपनीने दिनांक ०१.०८.२०२३ रोजीचा ना-हरकत दाखला घेतलेला असून, प्रदूषण नियंत्रण विभाग, कल्याण यांच्याकडून दिनांक १४.०३.२०२४ रोजीचा ना-हरकत दाखला घेतलेला आहे.

मे.टिना रबर ॲन्ड इंफ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीने दि.१२.१२.२०२३ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ नुसार औद्योगिक प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणेबाबत व कलम १४३ नुसार अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. सदर विनंती अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी स्तरावर तहसीलदार, वाडा यांच्यामार्फत चौकशी करून तसेच संबंधित सर्व विभागांचे अभिप्राय मागवून नियमोचित कार्यवाही करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मजुरांना रोजगार मिळण्याबाबत**

**(२०) २०८८ (२५-०४-२०२५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातून अल्पभूधारक शेतकरी व मजुरांचे रोजगार हमी योजनेच्या कामाअभावी अन्य ठिकाणी स्थलांतरण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामातील शेतीची कामे संपल्यानंतर हजारो मजुरांना रोजगार हमीच्या कामावर केवळ ३२१ मजुरांना रोजगार उपलब्ध झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मजुरांना रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२९-०५-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक २०.०१.२०२५ ला नागभिड तालुक्यात २५४ कामावर ३२९० मजूर उपस्थिती होती तर दिनांक २८.०१.२०२५ रोजी २०६ कामे सुरु होती त्यावर ५२१८ मजूर उपस्थिती होती.

(३) मजुरांना मागणीप्रमाणे कामे देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फलटण-कोरेगांव (जि. सातारा) येथील प्रशासकीय भवन इमारत बांधकामाकरीता निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(२१) २१०४ (२४-०४-२०२५). श्री.सचिन पाटील (फलटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण-कोरेगांव (जि. सातारा) येथील प्रशासकीय भवन इमारत बांधून सर्व शासकीय कार्यालये तथा विभागाचे कामकाज एकाच इमारतीतून व्हावे अशी मागणी तेथील नागरीकांनी शासनाकडे केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांची होणारी गैरसोय दूर होऊन एकाच ठिकाणी सर्व कार्यालये सुरु झाल्यास नागरीकांच्या सोयीचे होईल याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर प्रशासकीय इमारत बांधकामासाठी रू.१०० कोटीची शासनाकडे मागणी केली असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अप्पर मुख्य सचिव, महसूल यांनी त्याबाबत कार्यवाही करावी अशी सूचना मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून एकाच ठिकाणी प्रशासकीय कार्यालये सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) फटलण, जि.सातारा येथे प्रशासकीय भवन इमारत बांधकामाकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांच्या कार्यालयाकडून मुख्य अभियंता, यांच्या तांत्रिक मान्यतेसह अद्यावत दरसूचीवर आधारीत परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला असून शासनास प्रस्ताव प्राप्त होताच कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी गुड्यांची महसूली नोंद घेण्याबाबत

**(२२) २२३६ (२४-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अनेक आदिवासी गुडे विविध ग्रामपंचायत अंतर्गत येत असून सदर आदिवासी गुड्यांची नोंद अजूनही महसूली दप्तरी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी गुड्यांची महसूली नोंद झाली नसल्याने जमिनीचे व्यवहार, फेरफार, शासनाच्या विविध योजना व गावासाठी मिळणारे रस्ते, आरोग्य व शिक्षणाच्या सोयी-सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील २० ते २५ घरांचे आदिवासी गुडे महसूली नोंदीपासून वंचित असल्यामुळे मुलभूत सोयी सुविधा अभावी तेथील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन आदिवासी गुड्यांची नोंद महसूली दफ्तरी करून तेथे मुलभूत सोयी सुविधा देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०५-२०२५) :** (१) (२) व (३) हे खरे नसून पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

अ) कोरपना व जिवती तालुक्यातील ग्रामपंचायतीकडून आदिवासी गुड्यांना महसुली गाव घोषित करण्याचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.

ब) कोरपना तालुक्यातील आदिवासी गुडे हे जवळच्या महसुली गांवामध्ये समाविष्ट असून जमीनीचे व्यवहार व फेरफार सुरु आहे.

क) जिवती तालुक्यातील ७/१२ अभिलेखाचे अद्यावतीकरण सुरु असून जमाबंदी आयुक्त यांच्या आदेशान्वये फेर फार प्रक्रिया बंद आहे.

ड) मा.प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान मध्ये वरिल दोन्ही तालुक्यातील अतिदुर्गम व डोंगराळ भागात घराघरापर्यंत आरोग्य सेवा पुरवण्यात येते, हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव येथे साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभा करण्यासाठी शासकीय दूध संघाची जागा नि:शुल्क मिळण्याबाबत

**(२३) २२४२ (२८-०४-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभा करण्यासाठी शासनाने दिलेली शासकीय दूध संघाची जागा नि:शुल्क मिळण्यासाठी लोकप्रतिनिधीनी लेखी पत्राद्वारे दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शासकीय दूध शीतकरण केंद्र धाराशिव येथील सर्व्हे न.४२६ मधील १ एकर जागेचे मूल्यांकन करून हस्तांतरित करण्याचा निर्णय क्रं.दूवियो-१३२३/प्र.क्रं.३७/पदुम ९ दिनांक ०१ ऑगस्ट, २०२४ रोजी घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जागेचे मुल्यांकन करण्यासाठी नगरपरिषद धाराशिव यांनी असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिवमार्फत जा.क्रं.२०२०/नपप्र/कार्या-१/कावि१२०३/दिनांक २२/०१/२०२५ द्वारे शासनाकडे सदरहू जागा निशुल्कपणे हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला

आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०६-२०२५) :** (१), (२) व ३) हे खरे आहे.

(४) व (५) सदरची जागा विनामूल्य प्रत्यार्पित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्याकडून दिनांक २२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदरच्या प्रस्तावात त्रुटी असल्याने जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडून तपशिलवार मुद्यांची माहिती विभागाच्या दिनांक ०७ फेबुवारी,२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आली आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव व जामोद (जि.बुलढाणा) तालुक्यात अवैधरित्या प्लॉटची विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत

**(२४) २४१० (२६-०४-२०२५). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव व जामोद (जि.बुलढाणा) तालुक्यात वायाळ शिवारातील ई-क्लास जमिनीवर प्लॉटिंग करुन अवैधरित्या प्लॉटची विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी तहसीलदारांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित जमिनीवर प्लॉट पाडून विक्री करणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे,

मौ.वायाळ, ता.जळगाव जामोद येथील गट नं.१९२ मधील २.०० हे.आर जमीन तहसीलदार, जळगाव जामोद यांचे फाईलवरील राजस्व प्रकरण क्र.एल.ई.एन-३९/वायाळ/२४/१९९१-९२ मधील दिनांक २५.०५.१९९२ नुसार श्रीमती सिताबाई रामदास जाधव यांना वाटप करण्यात आली होती.

श्री.देविदास झेंडुजी तायडे यांनी दिनांक ०८.०१.२०२५ रोजी तहसीलदार, जळगाव जामोद यांच्याकडे श्रीम.सिताबाई रामदास जाधव यांनी रु.१००/-च्या साध्या स्टँप पेपरवर श्री.रफिक शहा रहेमान शहा यांना दिनांक २०.०१.२०१५ रोजी ९९ वर्षाचा भाडेपट्टा तसेच नोटरी विक्री करारनामा करुन दिला असल्याबाबत व श्री.रफिक शहा यांनी ९ ते १० व्यक्तिगत आठ अ तयार करुन सन २०२२ ते २०२४ या वर्षामध्ये लाखो रुपयांत प्लॉटची विक्री करीत असल्याबाबत तक्रार दाखल केली आहे.

(२) सदर प्रकरणी तहसीलदार, जळगाव जामोद यांचेकडे चौकशी सुरु असून सदर प्रकरणी अंतिम निर्णय झाल्यानंतर दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बडनेरा नवीवस्ती (जि.अमरावती) येथे नायब तहसीलदार कार्यालय सुरू करण्याबाबत

**(२५) २४९३ (२७-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा नवीवस्ती (जि.अमरावती) येथे नायब तहसीलदार कार्यालय सुरू करून उक्त कार्यालयातून बडनेरा शहर व आजूबाजूच्या खेडे गावातील नागरिकांना महसुली सेवा मिळवून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी मागणी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नायब तहसिलदार कार्यालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२५) :** (१) नाही.
(२) दिनांक २४/०१/२०२५ च्या शासनपत्रान्वये मागविण्यात आलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात येत असून त्यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) विभागात अप्पर तहसील कार्यालय सुरु करण्याबाबत

**(२६) २५५१ (२६-०४-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (ता. वसई, जि.पालघर) विभागाची अंदाजे लोकसंख्या १० लाखाहून अधिक असून सुमारे ६ लाख ८ हजार मतदार याठिकाणी असल्याने येथील नागरिकांना नागरी सुविधा तसेच विविध दाखले व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी वसई तहसील कार्यालयात जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तहसील कार्यालयावर अधिकच्या कामाचा भार आल्यामुळे नालासोपारा विभागातील नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून वाहतूकीसाठी अधिकचा भुर्दंड सोसावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे नालासोपारा विभागात राहणाऱ्या नागरिकांकडून अप्पर तहसील कार्यालय सुरु करण्याबाबतची मागणी वारंवार केली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मागणीच्या अनुषंगाने नालासोपारा विभागातील नागरिकांना उक्त सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०६-२०२५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय, अंशत: खरे आहे.
(४) दिनांक २४ जानेवारी, २०२५ च्या शासनपत्रान्वये मागविण्यात आलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात येत असून त्याअनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याबाबत

**(२७) २५६५ (२६-०४-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील मोलगी येथील अतिदुर्गम भागातील जनतेच्या सोयीसाठी एका महिन्याच्या आत अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याच्या सुचना व आदेश माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले असतानाही आत्तापर्यंत मोलगी येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०६-२०२५) :**(१), (२) व (३) नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात मोलगी येथे स्थानिक प्रशासकीय गरज विचारात घेऊन तात्पुरते अपर तहसील कार्यालय सुरु करण्यास व सदर कार्यालयासाठी सद्य:स्थितीत १ अपर तहसीलदार, १ नायब तहसीलदार, १ अव्वल कारकून व ४ महसूल सहायक (लिपिक-टंकलेखक) अशी एकूण ७ पदे विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अधिनस्त कार्यालयातून प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्याबाबत दिनांक ११/१०/२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, कार्यालय नाशिक यांच्या दिनांक ०४/१२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या दिनांक २६/१२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे.

---

### अंबाजोगाई (जि.बीड) येथे श्री मुकुंदराज स्वामी वन पर्यटनाच्या प्रस्तावाबाबत

**(२८) २५७७ (२७-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे श्री मुकुंदराज स्वामी मंदीराच्या भोवताली वन विभागाच्या जमिनीवर वन विभागामार्फत वन पर्यटन केंद्रास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पर्यटन केंद्राच्या ठिकाणी विविध विकास कामे करण्यासाठी शासनाने अर्धा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून उर्वरित निधी अद्याप उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२५-०६-२०२५) :** (१), (२) व (३) अंबाजोगाई (जि.बीड) येथे श्री मुकुंदराज स्वामी मंदीराच्या भोवताली पर्यटन केंद्राच्या ठिकाणी विविध कामे करण्यासाठी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी रु.८३९.०० लक्ष इतक्या रक्कमेच्या आराखड्यास सन २०२३-२४ व २०२४-२५ करीता मंजूरी दिली आहे. त्यानुसार सन २०२४-२५ करीता रु.२८९.४७ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच उर्वरित निधी मागणीचा प्रस्ताव विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार सदर कामांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) या दोन्ही तालुक्यात नाट्यगृह अथवा सांस्कृतिक भवन उभारण्याबाबत

**(२९) २६१८ (२६-०४-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) या दोन्ही तालुक्यात आदिवासींचा मोठा सांस्कृतिक वारसा असून जुन्या पिढी कडून नव्या पिढीला सांस्कृतिक वारसा मिळावा व त्याचे संवर्धन व्हावे यासाठी या दोन्ही तालुक्यात नाट्यमंदिर अथवा सांस्कृतिक भवन नसल्याने आयोजकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही तालुक्यात नाट्यगृह अथवा सांस्कृतिक भवन उभारण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नाट्यगृह वा सांस्कृतिक भवन उभारण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२५-०६-२०२५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम (जिल्हा वार्षिक योजना) मधुन अक्कलकुवा तालुक्यातील चार गावात व धडगांव तालुक्यातील दोन गावात सांस्कृतिक भवन मंजुर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे व्यारावली (जोगेश्वरी-विक्रोळी) सर्व्हे नं. ९ या भूभागावर**
**नवीन प्रकल्पाचे काम सुरु असल्याबाबत**

**(३०) २७१६ (२४-०४-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे व्यारावली (जोगेश्वरी - विक्रोळी) जोड रस्त्यावर न.भू.क्र १ (पै ) सर्व्हे नं.९ या भूभागावर नविन प्रकल्पाचे काम सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पाकरिता व्यारावलीच्या डोंगराचे मोठ्या प्रमाणात खोदकाम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त भूभागाच्या बाजूला शासनाची जागा असून त्या जागेवर जाण्यासाठी तेथील मार्ग बंद करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०२५) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका यांची बांधकाम परवानगी व दिनांक ०४.०८.२०२१ रोजी मंजूर इमारत आराखडा नुसार मौजे व्यारवली न.भु.क्र.१ पै.सर्व्हे क्र.९ यावर नवीन प्रकल्पाचे काम सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अहवालानुसार मंजुर विकास आराखडा-२०३४ नुसार नमुद न.भू.क्र.१ (वै) सर्व्हे क्र.९ नुसार नमुद व्यारवली येथील विषयांकित भूखंडावर हिलस्लोप (Hill Slope) असल्याचे नमूद नाही. तसेच दिनांक ३१.०१.२०२५ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी, मुंबई उपनगर यांनी केलेल्या स्थळपाहणीत केलेल्या अहवालात उत्खननातून निघणारे दगड जे.सी.बी.च्या सहाय्याने फोडण्याचे काम सूरू आहे. सदर प्रस्तावित इमारत बाधकामाच्या उत्तरेस ओबडधोबड टेकडी असून सदर क्षेत्राचा भूपष्ठ भाग समपातळीत करण्यासाठी त्या टेकडीचे सुरूंग लावून ब्लास्टिंगचे काम सुरू आहे.
(३) मौजे व्यारवली येथील नगर भूमापण क्रमांक १/१ या भुखंडालगत उत्तरेस नगर भूमापन कोंदिवटा येथील नगर भूमापन क्रमांक ५९४ हा शासकीय मिळकतीचा असून, सध्या तेथे खोदकाम सुरू असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव पायवाट बंद

आहे. या शासकीय भुखंडाकडे जाण्याकरीता जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड लगत नगर भुमापन मजास मधुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड या नावाने नगर भूमापन क्रमांक ५९४ या शासकीय भूखंडाकडे व त्या लगत असलेल्या झोपडपट्टीस पर्यायी रस्ता जागेवर उपलब्ध आहे.

(४), (५) व (६) मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २८.०१.२०२५ च्या पत्राच्या अनुषंगाने, तहसीलदार, अंधेरी यांनी दिनांक १३.०२.२०२५ रोजी स्थळपाहणी वेळी सदर भूखंडातून गौण खनिजाचे मेजर टेपच्या सहाय्याने मोजमाप केले असून त्यामध्ये ४१,२०९ ब्रास गौण खनिज उत्खनन केले असल्याचे आढळून आले आहे. सदर भूखंडातून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी ५०,००० ब्रासकरीता गौण खनिज उत्खनन परवानगी दिलेली असून, परवानगी पेक्षा अधिक उत्खनन झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्याच्या प्रलंबित त्रिविभाजनाबाबत**

**(३१) ३५६२ (२४-०५-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुका हा सर्वाधिक विस्तार क्षेत्रफळ असलेला दुष्काळी तालुका असून त्याच्या त्रिविभाजनाची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी बैठक आयोजित करून पुढील कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकारी यांना आदेशित करूनही अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्याचा त्रिविभाजनाचा प्रलंबित विषय मार्गी लावण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित त्रिविभाजनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०६-२०२५) :** (१) होय.

(२) तत्कालीन मा.महसूल मंत्री यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये श्री.दांगट, सेवानिवृत्त भा.प्र.से. यांच्या अध्यक्षतेखालील समितीशी चर्चा करुन व वेळ घेवून निवेदन सादर करावे. तसेच दांगट समितीने सदर मागणी तपासून त्यांच्या एकत्रित अहवालात या मागणीचा परामर्श घेवून अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश दिले होते. तथापि, श्री.दांगट, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली समिती दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आली आहे.

(३) उक्त तालुक्याचा त्रिभाजनाचा प्रलंबित विषय मार्गी लावण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे दिलेले निवेदन अद्याप प्राप्त झालेले दिसून येत नाही.

(४) व (५) दिनांक २४/०१/२०२५ च्या शासनपत्रान्वये नवीन कार्यालय निर्मितीच्या अनुषंगाने मागविण्यात आलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात येत असून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.

---

**पिंपरी-चिंचवड अप्पर तहसील कार्यालयाअंतर्गत २३ तलाठ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) ३६३० (२६-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहरातील अप्पर तहसील कार्यालयांतर्गत ३१ तलाठी कार्यालयाचा समावेश होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर तहसील कार्यालयअंतर्गत सरोली, निगडी, पिंपरी, केवढे, रहाटणी, मोशी, भोसरी, चिखली, सांगवी या कार्यालयातच तलाठी असून इतर २३ तलाठी कार्यालयामध्ये तलाठी नेमले नसल्याचे दिनांक १८ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, अप्पर तहसील कार्यालयांतर्गत २३ तलाठी कार्यालयामध्ये पूर्ण वेळ तलाठी नसल्याने उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला व इतर शासकीय दाखले काढण्यास नागरिकांना मोठ्या प्रमाणावर फेऱ्या मारावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरातील अप्पर तहसील कार्यालयअंतर्गत २३ तलाठी कार्यालयाचा अतिरिक्त कारभार इतर आठ तलाठ्यांना करावे लागत असल्याने पिंपरी-चिंचवड अप्पर तहसील कार्यालयातील शासकीय दाखले मिळण्यास नागरिकांना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहु अप्पर तहसील कार्यालयातील तलाठ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक १८/०५/२०२४ अखेर अप्पर तहसील कार्यालय पिंपरी-चिंचवड अंतर्गत एकूण ३१ तलाठी सजांपैकी रिक्त असलेल्या २३ तलाठी सजांचा कार्यभार इतर तलाठ्यांकडे सोपवून सदर सजांचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यात आले आहे.
(५) व (६) दिनांक २०/०५/२०२५ अखेर अप्पर तहसील कार्यालय पिंपरी-चिंचवड येथील आस्थापनेवर एकूण ३१ सजांपैकी ३० सजांवर ३० तलाठी कार्यरत असून रिक्त असलेले पद भरण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

## सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील तहसीलदार यांनी नियमाबाह्य व पदाचा दुरुपयोग करून चुकीच्या पद्धतीने फेरफार केल्याबाबत

**(३३) ३७६९ (२८-०४-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील तहसील कार्यालयातील तत्कालीन तहसीलदार यांनी पदाचा दुरुपयोग करून नियबाह्य पद्धतीने मौजा सावली येथील सर्वे नं.१७६, १४६० व १८४ या शेतीच्या सातबारा व आठ-अ मध्ये श्रीमती सुरेखा संतोषवार व श्रीमती सुरभी संतोषवार यांच्या नावाची नोंद घेण्यासाठी चुकीच्या पद्धतीने फेरफार करण्याचे आदेश देऊन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजा सावली येथील उक्त सर्वे नंबरवर सातबारा असलेली शेती ८४ वर्षाच्या ज्येष्ठ महिला श्रीमती इंदुबाई बाबुराव संतोषवार यांच्या नावे असून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास देण्यासाठी फेरफार करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०५-२०२५) :** (१) व (२) हे खरे नसून प्रस्तुत प्रश्नाबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.
मा.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) चंद्रपूर यांचे हुकूमनाम्यानुसारच मौजा सावली येथील सर्व्हे क्र. १७६,१८४,१४६० या ७/१२ पत्रकामध्ये श्रीमती सुरेखा रविंद्र संतोषवार व श्रीमती सुरभी रविंद्र संतोषवार यांची नावे सामाईक खात्यात दाखल करण्याची कार्यवाही तत्कालीन तहसिलदार, सावली यांनी केलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे सोनबर्डी (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील सोनबर्डी गावाच पुनर्वसन करण्याबाबत**

**(३४) ३८६८ (२५-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनबर्डी (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील गावास अतिवृष्टीमुळे पूर आल्यास गावाचा संपर्क तुटत असल्याने भौगोलिक परिस्थितीनुसार सदर गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सोनबर्डी गावाच्या पुनर्वसनाला माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुनर्वसनाच्या कामास सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (१८-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव यांनी दिनांक २१.११.२०२२ रोजी झालेल्या आपत्ती व्यवस्थापन बैठकीत सदर प्रस्तावास तत्वत: मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे.

(३) सोनबर्डी ग्रामस्थांनी व ग्रामसभेने पुनर्वसनासाठी प्रस्तावित केलेले गट वेळोवेळी बदलवले असून गट निश्चित करण्यासाठी विलंब झाला आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव यांचे आदेश दिनांक १७/११/२०२२ अन्वये पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करणे कामी नियुक्त केलेल्या यंत्रणांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, जळगाव यांनी परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरून पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वाशिम जिल्ह्यासह ई-पीक नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत**

**(३५) ४३११ (२५-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप हंगाम २०२३ मधील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी ५ हजार रुपये अर्थसहाय्य मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ई-पीक नोंदणी न केलेले शेतकरी हे अर्थसहाय्याच्या प्रतिक्षेत कायम असून यामध्ये वाशिम जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन वाशिम जिल्ह्यासह राज्यातील ई-पीक नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांना तातडीने अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०७-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे .

(२) सदर योजनेंतर्गत खरीप २०२३ मध्ये ज्या कापूस / सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी ई-पिकपाहणी पोर्टलवर नोंद केलेली नाही, तथापि, ज्यांची खरीप २०२३ च्या ७/१२ उताऱ्यावर कापूस / सोयाबीन पिकाची नोंद आहे असे खातेदार,

वनपट्टे धारक खातेदार व चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील Non-digitalized गावातील खरीप २०२३ मधील कापूस /सोयाबीन उत्पादक खातेदार यांचा समावेश आहे.

(३) दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये, खरीप २०२३ मध्ये ज्या कापूस / सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणीवर नोंद केलेली नाही, तथापि, ज्यांची खरीप २०२३ च्या ७/१२ उताऱ्यावर कापूस / सोयाबीन पिकाची नोंद आहे अशा खातेदारांना अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

सद्य:स्थितीत वाशिम जिल्ह्यातील वरीलप्रमाणे एकूण पात्र २,४६,८३९ खातेदारांना रु.११४,४१,९७,२०४/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शहराप्रमाणे गावांमध्येही मिळकत पत्रिका मिळण्याबाबत

**(३६) ४३२४ (२७-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शहराप्रमाणेच गावांमध्येही मिळकत पत्रिका देण्यात येत असून किमान ३०,६१४ गावांपैकी ४९ टक्के म्हणजेच १४,९५२ गावांमध्ये सदरहू काम पुर्ण झाले असून मिळकतीचे नकाशे काढण्यासाठी ड्रोनचा वापर करण्यात येत असल्याने या कामामध्ये अचूकता वाढणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या स्वामित्व योजनेंतर्गत राज्यातील भूमी अभिलेख विभागाकडून राज्यातील गावांमध्ये मिळकत पत्रिका (प्रॉपर्टी कार्ड) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून ड्रोनच्या वापरामुळे नागरिकांमध्ये हद्दीवरुन असणारे वादही कमी होऊन संपूर्ण राज्यात लवकरात लवकर मिळकत पत्रिका मिळावी याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०६-२०२५) :** ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक २२.०२.२०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने दिनांक २४ एप्रिल, २०२० पासून सदर प्रकल्प देशभरात स्वामित्व योजना म्हणून राबविण्यास मान्यता दिली आहे.

सदर योजनेत मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून ३४ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला असून स्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांना मिळकतीचा अधिकृत दस्तऐवज म्हणून मिळकत पत्रिका देण्यात येत आहेत.

स्वामित्व योजना प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने खालील कार्यवाही करण्यात येत आहे:

(१) स्वामित्व योजनेबाबत ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक २१.०१.२०२० अन्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जमाबंदी आयुक्त, पुणे या कार्यालयामार्फत दिनांक २३.११.२०२० रोजी मार्गदर्शक सूचना व आवश्यक परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(३) स्वामित्व योजनेंतर्गत दिनांक ०९.०५.२०२५ अखेर राज्यात ३४ जिल्ह्यांमधील समाविष्ट ३०४९१ गावांपैकी १७६९१ (५८.९०%) गावांमध्ये एकूण २८,३९,७७६ मालमत्ता पत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचारी दर्जा देण्याबाबत**

**(३७) ४६५२ (२७-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२ हजाराहून अधिक कोतवाल कार्यरत असून जमीन दस्तऐवजांच्या कामासोबतच त्यांच्याकडे तहसील कार्यालयातील निवडणूकीचे काम तसेच राज्य व केंद्र सरकारने जाहीर केलेल्या विविध योजनांची कामे दिली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोतवाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधा अपुऱ्या असून त्यांना मिळणारे मानधन देखील कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विविध विभागांमध्ये चतुर्थश्रेणी संवर्गाच्या जागा रिक्त असून कोतवालांना त्या जागांमध्ये सामावून घेण्यासंदर्भातील निवेदन दिले असून त्यासाठी आंदोलनेही केले आहेत अद्याप शासनाने यासंदर्भात ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४.१०.२०२४ अन्वये महसूल विभागातील कोतवालांचे पदनाम बदलून "महसूल सेवक" असे करण्यात आले आहे. महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ६.४.२०२३ अन्वये दि.१.४.२०२३ पासून महसूल सेवकांना रू.१५,०००/- इतके मानधन लागू करण्यात आले आहे. तसेच, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ७.१०.२०२४ अन्वये महसूल सेवकांच्या मानधनामध्ये दिनांक १.४.२०२६ रोजीपासून १० टक्के इतकी वाढ करण्यात आलेली आहे. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ७.१०.२०२४ अन्वये महसूल सेवकांना अनुकंपा धोरण लागू करण्यात आले आहे. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ८.१०.२०२४ अन्वये राज्यातील महसूल सेवकांना महत्त्वाच्या सणानिमित्त देण्यात येणाऱ्या सण अग्रिमाच्या रकमेत रू.२०००/- वरून वाढ करण्यात येऊन रू.१०,०००/- इतके सण अग्रिम करण्यात आले आहे. तसेच, महसूल व वन विभाग, शासन पत्र दिनांक १६.१०.२०२४ अन्वये महसूल सेवकांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयास संलग्नित न करता संबंधित त्या-त्या सजा कार्यालयास त्वरीत वर्ग करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**राज्यात शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेंतर्गत विनामुल्य फळकलमे देण्याच्या धोरणाबाबत**

**(३८) ४६६४ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड ही सन १९९१-९२ पासून सुरु असून या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुन या योजनेच्या अंमलबजावणीत काही उणीवा असल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळू शकले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी तीन महिन्यांचे काजू कलमे पुरविण्यात आली होती ती वयाने लहान, कमकुवत असल्याने सुकून आणि वणव्यामुळे नष्ट झाल्याने शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड नोंद दिसत असल्या तरी प्रत्यक्षात लागवड केलेली कलमे अस्तित्वात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकडून पहिल्या लागवडीची नोंद दिसल्याने नवीन लागवडीचा लाभ त्यांना घेता येत नसून

शेतकरी लाभापासून वंचित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, फलोत्पादनासाठी ज्या शेतकऱ्यांची फळबाग लागवड सन २०२४ मध्ये नष्ट झाली आहेत, त्या शेतकऱ्यांना सन २०२५-२६-२७ या खरीप हंगाम फळबाग लागवडीत योग्य वयाची व उपयुक्त रोपे देण्यासंदर्भात सकारात्मक धोरण व ही योजना पुढील तीन वर्षांसाठी राबविण्याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (०६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही,

राज्यात सन १९९० ते २०१२-१३ पर्यंत रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड राबविण्यात आली तदनंतर सदर योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली असून, राज्यात मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे, खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भूसंपादन कायदा, २०१३ LARR अधिनियम, भू-संपादन प्रक्रियेतील विलंबाबाबत**

**(३९) ४६९८ (३०-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूसंपादन कायद्याखाली (LAND ACQUISITION ACT) सन २०१३ नुसार अधिग्रहित केलेले आरक्षित भूखंड विकास आराखड्याकरिता जिल्हाधिकारी मुक्त करून देत नसल्याने आणि सन २०१९ पासुन बृ.मुं.म.न.पा. अशा भूखंडांना नकार देत असल्याने अनेक प्रलंबित प्रकल्प कायदेशीर तरतुदींनुसार भूखंड सुपूर्त करण्यापूर्वी हक्कधारकांचे पुनर्वसन वा हटविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी भूखंड देण्यापूर्वी आवश्यक पुनर्वसन आणि पुर्नप्रक्रिया पूर्ण केली नसून "जसे आहे तसे" या तत्त्वावर भूखंड स्वीकारण्याचे हमीपत्र देण्यात आले असून LARR अधिनियम,२०१३ च्या तरतुदींना विरोध केला आहे. तसेच, प्रलंबित भू-संपादन प्रस्तावांसाठी मुक्त होईपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडून सुपूर्त करण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अधिनियम,२०१३ च्या अंतर्गत सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच भूखंड सुपूर्द करण्याकरीता तसेच आर्थिक व्यवहार व भरपाई रक्कम अडचणमुक्त भूखंडाची हमी मिळण्यापूर्वीच दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर भूखंड संपादन सुपूर्द न झाल्यामुळे सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्प अडचणीत आले असून त्याचा आर्थिक तोटा आणि खर्चवाढ होऊन सन २०१९ पासून जिल्हाधिकारी व बृ.मुं.म.न.पा. यांच्यातील हा कोंडमारा सोडविण्यासाठी कोणतेही ठोस पाऊले उचलले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१२-०६-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) "बृहंन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील भूसंपादन प्रकरणांमध्ये भूसंपादन संस्थेकडून "जसे आहे तसे" या तत्वावर ताबा स्विकारणेबाबत हमीपत्र देण्यात आले

होते. सदर भूसंपादन प्रकरणी सन २०१९ पासुन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून १ व मुंबई उपनगर यांचेकडून १४ प्रकरणांमध्ये निवाडा पारित करण्यात आला असून भूसंपादनाखालील जमिनीचा ताबा "जसे आहे तसे" स्वरुपात बृहन्मुंबई महानगरपालिका यांना देण्यात आला आहे.

दरम्यान नगर विकास विभाग, आदेश दिनांक २९.०३.२०२३ प्रमाणे प्रस्तावित भूसंपादित भूखंड अंशत/पूर्णत: भारग्रस्त असल्या कारणास्तव सदर प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २३.०१.२०२४ नुसार भारग्रस्त प्रकरणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याकरीता बृहंन्मुंबई महानगरपालिकेस परत पाठविलेली आहेत. सदर प्रकरणे बृहंन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २३.०१.२०२४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे भूसंपादनाकरीता सादर केली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विभागातील सिंचन विहीरींसाठी अनुदानात वाढ करण्याबाबत

**(४०) ४७४४ (२५-०४-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर व वर्धा जिल्ह्यात शेतकऱ्यांना सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रमांतर्गत १३ हजार सिंचन विहीरी बांधकामासाठी सन २०१८-१९ च्या दरसूचीप्रमाणे प्रति विहीर रु.२.५० लक्ष प्रमाणे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार मंजूरी देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोविड-१९ संसर्ग, तालुका स्तरावर तांत्रिक बाबींच्या पूर्तता वा पुरेशा निधीच्या तरतुदी अभावी या विहीरींच्या बांधकामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ३० जून, २०२५ पर्यंत बांधकामासाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विहीरींच्या बांधकामासाठी सन २०१८-१९ ची दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले २.५० लक्ष चे अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत बांधकाम साहित्य, मजुरीचे वाढलेले दर तसेच शासनाने भगवान बिरसा मुंडा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना विहीरींचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी अनुदानात रु.२.५० लक्ष वरुन रु.४.०० लक्ष वाढ करण्याची शेतकऱ्यांकडून मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागणीच्या अनुषंगाने अनुदानात रु.२.५० लक्ष वरुन रु.४.०० लक्ष वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (०६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्य शासनाने प्रथमत: कोविड-१९ संसर्ग व तद्नंतर सिंचन विहिरींची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) धडक सिंचन विहिर योजनेस दिनांक ३०.०६.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तद्नंतर योजनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह पुणे जिल्ह्यातील ३५ लाख दस्तांच्या तपासणीत शासनाचे कोट्यवधी रुपयाच्या महसूलाचे नुकसान झाल्याबाबत

**(४१) ५१६० (०२-०३-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-

(१) मुंबई आणि पुणे जिल्ह्यातील सन २०१९ ते २०२४ या कालावधीतील बक्षिसपत्रे, खरेदी खत व जमीन हस्तांतरण अशा सुमारे ३५ लाख दस्तांच्या तपासणीत स्थावर संपदा तथा मालमत्ता (महारेरा), अकृषिक (एनए) व तुकडे बंदी नियम इ. कायद्याचे उल्लंघन करुन सुमारे १ हजाराहून अधिक दस्तांच्या नोंदणीत गैरव्यवहार करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दस्तऐवजांची नोंदणी करताना ७२० पेक्षा अधिक दस्तांमधून कमी रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरणे तसेच कमी क्षेत्र दस्त नोंद केल्याचे आक्षेप नोंदवून ३५ लाख दस्त नोंदणीचा तपासणी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन महसूलाची वसूली करण्यासह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०३-२०२५) :** (१) हे खरे आहे.

अशा प्रकारच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्याने शासन पत्र दिनांक ०७.०२.२०२४ अन्वये मुंबई व पुणे जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयातील सन २०१९ ते २०२४ या कालावधीत नोंदणी केलेल्या दस्तांची सर्वंकष तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी पथक गठीत करण्यात आलेले असून तपासणी पथकाचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार तपासणीचे काम सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई शहर व मुंबई उपनगर या कार्यक्षेत्रातील एकूण २६ कार्यालयांपैकी ०४ कार्यालयांची तपासणी पूर्ण झाली आहे. तसेच पुणे शहर व पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील ४८ कार्यालयांपैकी १० कार्यालयांची तपासणी पूर्ण झाली आहे. उर्वरित कार्यालयांच्या तपासणीतील आक्षेपांबाबत विशेष तपासणी पथकाकडून तपासणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) नोंदणी महानिरीक्षक यांचेकडून तपासणीचा अहवाल अद्यापी अंतिम झालेला नाही. अहवालावर अंतिम निर्णय झाल्यानंतर महसूल वसूली व दोषींवर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सामुदायिक स्वयंपाकघर या संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या जेवणातून विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा

**(४२) ५१६१ (०२-०३-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील रणकोळ, आंबेसरी, खंबाळे, तवा, नानीवली, महालक्ष्मी यासह १० आश्रमशाळांना कांबळगांव येथील कम्युनिटी किचनमधून पुरविण्यात आलेल्या जेवणात दुधी भोपळ्याची भाजी खाल्ल्याने ४३१ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याने तातडीने उपचाराकरिता पालघर, डहाणू व कासासह विविध रुग्णालयात दाखल करावे लागल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात आदिवासी विकास विभागातील अधिकारी व जेवण पुरविणाऱ्या संस्थांचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळे अशा घटना गांभीर्याने न घेता त्या दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना दर्जेदार जेवण पुरविण्याबाबत तसेच दोषी संस्था व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (११-०३-२०२५) :** (१) होय, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत मध्यवर्ती स्वंयपाकगृह, कांबळगाव, ता.जि.पालघर येथे दिनांक ०५.०८.२०२४ रोजी मध्यवर्ती स्वंयपाकगृहामार्फत विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या जेवणातून एकूण १४ शासकीय आश्रमशाळांमधील ३८१ विद्यार्थ्यांना पोटदुखी, उलटी, मळमळ असा त्रास झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.
(२) हे खरे नाही.
(३) दिनांक ०५.०८.२०२४ रोजी मध्यवर्ती स्वंयपाकगृहामार्फत विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या अन्न नमुन्याची अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, पालघर यांनी तपासणी केली असता त्यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार अन्न नमुन्यामध्ये काही आक्षेपार्ह नसल्याचे आढळून आले आहे.

मात्र तरीही विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून उक्त प्रकरणी मध्यवर्ती स्वयंपाकगृह येथील कार्यरत व त्यादिवशी जेवणाची तपासणी केलेले गुणवत्ता तपासक यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच कार्यरत दोन्ही अधिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात आलेली असून त्यांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील वनरक्षक व वनसेवक यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४३) ५२३६ (२५-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करुन पर्यावरणाच्या दृष्टीने काम करण्याकरिता १३५८ वनरक्षक व १२९९१ वनसेवकांची पदे रिक्त असून ही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबतची माहिती माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंत्राटी वनसेवकांना प्रतिमहिना १५ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वनरक्षक व वनसेवकांची रिक्त पदे कायमस्वरुपी भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?
**श्री. गणेश नाईक (२६-०६-२०२५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. वन विभागातील वनरक्षकाची ७७८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर या कार्यालयामार्फत सुरु आहे. वनरक्षक भरती प्रक्रिया, २०२३ मधील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली एकूण ७१५ रिक्त पदे सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक ५.१०.२०२४ मधील तरतुदीनुसार मानधन तत्वावर भरण्यात आलेली आहेत. वनसेवकांची पदे निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे. अशा रीतीने वनसेवकांची पदे अद्याप निर्माण झालेली नसल्यामुळे सदर पदे रिक्त असण्याचा अथवा कंत्राटी वनसेवकांना मानधन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी महाडीबीटीवरील सोडत प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ५३८३ (२७-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेती अवजारांसह बियाणे, खते, ठिबक, तुषार, शेततळयासह फलोत्पादन, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे व अन्य सिंचन साधने आदी बाबींचा कृषी विभागाकडून लाभ दिला जात असून सन २०२१ पासून ‘महाडीबीटी’ पोर्टलच्या

माध्यमातून या योजनांचा लाभ दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनांसाठी उद्दिष्टांपेक्षा अधिक अर्ज आल्यास सोडत काढून शेतकऱ्यांची निवड केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी माहे फेब्रुवारी, २०२४ नंतर सोडत निघाली नसून लाखो (३,७५,०००) अर्ज प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी सोडत काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (१६-०६-२०२५) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) कृषी यांत्रिकीकरण योजने अंतर्गत फेब्रुवारी, २०२४ नंतर दिनांक १३.०३.२०२४ ते दिनांक २५.०३.२०२५ या कालावधीत एकूण ७ वेळा सोडती (लॉटरी) काढण्यात आलेल्या असून, राज्यातील एकूण २,०१,६३९ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्हयातील निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या १२०५९ इतकी आहे. महाडीबीटी पोर्टलवरील सर्व प्रक्रिया पूर्ण करून अनुदान अदायगीसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांना उपलब्ध निधीच्या प्रमाणानुसार लाभार्थींच्या आधारसंलग्न बँक खात्यावर अनुदान अदायगी करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कालावल-हडी-तोंडवळी (ता. मालवण,जि. सिंधुदुर्ग) येथील गड नदीच्या पात्रातून वाळू उपसा केल्यामुळे ग्रामस्थांच्या घरांना तडे गेले असल्याबाबत

**(४५) ५४१४ (२८-०४-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कालावल, हडी व तोंडवळी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील गड नदीच्या पात्रातून सन २०२० या कालावधीपासून अवैध वाळू उपसा होत असून उक्त गावातील नदीलगतच्या जमिनीचा भाग खचून ग्रामस्थांच्या घरांना तडे गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी तक्रार करुन वाळू उपसा रोखण्याकरीता ग्रामस्थ व महिला आंदोलकांनी नदीच्या पात्रात उतरून माहे जानेवारी, २०२५ मध्ये साखळी उपोषण करूनही यासंदर्भात तहसीलदार, मालवण यांनी कोणतीही दखल घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी शांततेच्या मार्गाने वाळू उपसा विरोधी आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांना जमावबंदी आदेश जारी करुन पोलिसांनी नोटीसा पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गड नदीतून केल्या जाणाऱ्या वाळू उपशाबाबत मेरी टाईम बोर्ड यांनी शासनास अहवाल सादर केला आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०६-२०२५) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

कालावल खाडीतील तोंडवळी हडी येथे वाळू उत्खनन होऊ नये याबाबत तोंडवळी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयास तक्रार केली आहे.

तोंडवळी ग्रामस्थांनी तक्रार केलेल्या क्षेत्रामध्ये वाळू उत्खनन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत परवाने देण्यात आलेले होते. ग्रामस्थांनी तक्रार केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कालावल खाडी पात्रातील शेलटी ते हडी मुख्य गट-B, उपगट B-३ या गटाचे पुनःश्च जलआलेखन, सर्वेक्षण व सिमांकन दिनांक २०.०१.२०२५ रोजी करणेत आलेले आहे. सदर सर्वेक्षण व सिमांकन वेळी उपोषणकर्ते यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

तसेच तोंडवळी ग्रामस्थांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडून बी-३ या हातपाटी गटामधून वाळू उत्खनन व वाहतूक करणेसाठी कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.

दिनांक १३.०१.२०२५ रोजी ग्रामस्थांनी केलेल्या उपोषणा- संदर्भात जमावबंदी आदेश जारी केले नसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये याकरीता भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६८ प्रमाणे नोटीसा बजावणी करण्यात आल्या होत्या.

(४) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी उपयोजनेंतर्गत सर्व शाळांचे वेतन नियमित करण्याबाबत

**(४६) ५६०८ (२७-०४-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २००८ पासून सुरु असलेल्या शाळांचे सोळा वर्षांपासून वेतन अनियमित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व शाळांना वेतन अनियमित होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या सर्व शाळांचे वेतन नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (१६-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये २५ शासकीय व ४० अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. सदर आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्याचे वेतन नियमित अदा करण्यात येत आहे. केवळ माहे डिसेंबर,२०२४ व माहे जानेवारी, २०२५ चे वेतन अदा करण्याकरीता निधीची तरतूद उशिरा प्राप्त झाल्याने एक महिन्याचे वेतन विलंबाने अदा करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत केळी लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याबाबत

**(४७) ५६४५ (२५-०४-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत केळी लागवडीचा समावेश केल्यानंतर ३० टक्के उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळी लागवडीसाठी पात्र लाभार्थ्यांनी किती उद्दिष्ट व लाभ घेतला असून शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी कोणते कार्यक्रम राबविले जात आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (०६-०६-२०२५) :** (१) दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मनरेगा अंतर्गत फळबाग योजनेमध्ये केळी या पिकाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.
(२) मनरेगा अंतर्गत फळपिक निहाय उद्दिष्ट देण्यात येत नसून, लाभार्थी त्यांच्या पसंतीनुसार/गरजेनुसार फुलपिक/फळबाग/वृक्ष लागवड करतात. सन २०२४-२५ मध्ये एकूण ७,२१५ हे. क्षेत्रावर केळी या फळपिकाची लागवड मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड या योजनेंतर्गत झाली आहे. याबाबत कृषी विभागामार्फत तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन केले जाते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व समाजाला मोफत शिक्षण, रोजगार हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व इतर जनतेच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(४८) ५७४४ (२५-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व समाजाला मोफत शिक्षण, रोजगार हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, तसेच जनतेच्या इतर मागण्या मान्य करण्यासाठी सत्यशोधक सर्वोदय संघटना महाराष्ट्र (मु.पो.गागोदे बुद्रुक, ता.पेण, जि.रायगड) यांनी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री व जिल्हाधिकारी (रायगड), उपविभागीय अधिकारी यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाद्वारे केलेल्या मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (०६-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनात रोजगार हमी कायदयाची अंमलबजावणी करण्याबाबत व रु.५००/- मजुरी देण्याची मागणी केली आहे. तथापि, मजुरीच्या दरात वाढ करण्याची बाब सपुर्णत: केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. केंद्रशासनाने आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता महाराष्ट्र राज्याकरीता ३१२/- मजुरीचा दर निश्चित केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील बंद पडलेल्या गुरवळा नेचर सफारी प्रकल्पाच्या विकासाबाबत

**(४९) ६९८६ (२८-०४-२०२५). डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील गुरवळा नेचर सफारी प्रकल्पावर आजतागायत शासनातर्फे किती खर्च करण्यात आला असून त्यास किती पर्यटकांनी भेट दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदर नेचर सफारी प्रकल्प बंद पडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नेचर सफारी प्रकल्पाच्या विकासाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२५-०६-२०२५) :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्ह्यातील गुरवळा नेचर सफारी प्रकल्पास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १० Flush Causeway कामावर रक्कम रु.३७.८६ लक्ष व सन २०२३-२४ मध्ये रक्कम रु.८८.९४ लक्ष इतका खर्च व १ मुरुम रोड रक्कम रु.९.६९ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच सदर गुरवळा नेचर सफारी प्रकल्पास सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत एकूण ६१५२ इतक्या पर्यटकांनी भेट दिली आहे. सदर प्रकल्प हा कार्यान्वीत असून, सदर ठिकाणी पर्यटकांसाठी अतिरिक्त सोयी सुविधा निर्माण करण्याकरीता महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचेकडे निसर्ग पर्यटन विकास आराखडा मंजूरी करीता सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील वाडी- तांड्याचे विभाजन करुन महसुली गावाचा दर्जा देण्याबाबत**

**(५०) ७०४१ (३०-०४-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील ३०० लोकसंख्येच्या वाडी व तांड्याचे महसूल विभाजनाचे ४० पात्र प्रस्ताव भूमी अभिलेख कार्यालयात प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील पात्र प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करुनही संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी त्रुटीचे कारण देऊन प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी महसूली गावाचे विभाजन करुन अभिलेखे अद्यावत करण्यासाठी जिल्हाधिकारी नांदेड, तहसिलदार यांच्याकडे लेखी मागणीचे पत्र देऊनही जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्ताव प्राप्त गावाच्या विभाजनाबाबत दुर्लक्ष केल्यामुळे गावातील नागरिकांना शासनाच्या इतर कोणत्याही महसुली गाव योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त गावाचे विभाजन करुन अभिलेखे अद्यावत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) सन २०१८ मध्ये मुखेड तालुक्यातील घोटनखोरीतांडा, शिवाजीनगर तांडा, हनुमानपुर, भवानीनगर तांडा, इंदिरानगर तांडा, सोनानाईक तांडा, दामला तांडा, तुकाराम चेअरमन तांडा अशा एकूण ८ वाडी/तांडयांची प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.
सदर अधिसुचनेनुसार मौ. घोटनखोरीतांडा वगळता उर्वरीत ७ नवनिर्मित गावांचे आकारबंद व नकाशातयार करण्यास अडचण निर्माण होत असल्याने सुधारीत अधिसूचना निर्मितीची कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.